RNI No. MAHBIL /2009/31747

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-ल

वर्ष १२, अंक ५१] गुरुवार, नोव्हेंबर ५, २०२६/कार्तिक १४, शके १९४८ [पृष्ठे ५३ किंमत : रुपये १६.००

असाधारण क्रमांक ९८

प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

कामगार विभाग

मंत्रालय, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ५ नोव्हेंबर २०२६

अधिसूचना

वेतन संहिता, २०१९.

क्रमांक कावेस-०१२६/प्र.क्र.०९/कामगार-७.—वेतन संहिता, २०१९ (२०१९ चा २९) याच्या कलम ६७ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा ११) अन्वये केलेल्या महाराष्ट्र किमान वेतन नियम, १९६३ आणि वेतन प्रदान अधिनियम, १९३६ (१९३६ चा ४) अन्वये केलेल्या महाराष्ट्र वेतन प्रदान नियम, १९६३ यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त संहितेच्या कलम ६७ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेले पुढील नियम करीत आहे :—

प्रकरण-एक

प्रारंभिक

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.**—(१) या नियमांस, महाराष्ट्र वेतन नियम, २०२६ असे म्हणावे.

(२) ते, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असतील.

(३) ते, शासकीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—(१) या नियमांमध्ये, विषय किंवा संदर्भ यांनुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "अपील" याचा अर्थ, कलम ४९ च्या पोट-कलम (१) अन्वये केलेले अपील, असा आहे;

(ख) "अपिलीय प्राधिकारी" याचा अर्थ, कलम ४९ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने नियुक्त केलेला अपील प्राधिकारी, असा आहे;

(ग) "प्राधिकारी" याचा अर्थ, कलम ४५ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने नियुक्त केलेला प्राधिकारी, असा आहे;

(घ) "मंडळ" याचा अर्थ, कलम ४२ च्या पोट-कलम (४) अन्वये राज्य शासनाने घटीत केलेले महाराष्ट्र राज्य सल्लागार मंडळ, असा आहे;

(ड.) "अध्यक्ष" याचा अर्थ, मंडळाचा अध्यक्ष, असा आहे;

(च) "संहिता" याचा अर्थ, वेतन संहिता, २०१९ (२०१९ चा २९), असा आहे;

(छ) "समिती" याचा अर्थ, कलम ८ च्या पोट कलम (१) च्या खंड (क) अन्वये राज्य शासनाने नियुक्त केलेली समिती, असा आहे;

(ज) "दिवस" याचा अर्थ, मध्यरात्रीपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी, असा आहे;

(झ) "इलेक्ट्रॉनिक पद्धतीने" याचा अर्थ, या संहितेच्या प्रयोजनासाठी ईमेलद्वारे सादर केलेली किंवा विनिर्देशित पोर्टलवर अथवा मोबाइल ॲप्लिकेशनवर किंवा वेबसाइटवर ठेवलेली किंवा प्रदर्शित केलेली कोणतीही माहिती किंवा कोणत्याही पद्धतीने केलेले डिजिटल प्रदान,असा आहे;

(ञ) "नमुना" याचा अर्थ, या नियमांस जोडलेला नमुना, असा आहे;

(ट) "अति कुशल व्यवसाय" याचा अर्थ, ज्याकरिता, त्याच्या कामगिरीनुसार परिपूर्णतेच्या विशिष्ट पातळीची गरज असते आणि ज्यासाठी सखोल तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण किंवा दीर्घ कालावधीचा प्रात्यक्षिक व्यवसायिक अनुभव यामार्फत संपादन केलेली सक्षमता आवश्यक असते आणि असा व्यवसाय करताना, कर्मचाऱ्याने त्यामध्ये अंतर्भूत असलेली त्याची विवेकबुद्धी व निर्णयक्षमता यांची संपूर्ण जबाबदारी घेण्याची आवश्यकता देखील ग्रहण केलेली असते असा व्यवसाय, असा आहे;

(ठ) "निरीक्षक-तथा-सुविधाकार" याचा अर्थ, कलम ५१ च्या पोट-कलम (१) अन्वये अधिसूचनेद्वारे, राज्य शासनाने नियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे;

(ड) "सदस्य" याचा अर्थ, मंडळाचा सदस्य, असा आहे आणि त्यामध्ये, अध्यक्षाचा समावेश होतो;

(ढ) "नोंदणीकृत श्रमिक संघ" याचा अर्थ, औद्योगिक संबंध संहिता, २०२० (२०२० चा ३५) या अन्वये नोंदणी केलेला श्रमिक संघ, असा आहे;

(ण) "अनुसूची" याचा अर्थ, या नियमांस जोडलेली अनुसूची, असा आहे;

(त) "कलम"याचा अर्थ, या संहितेचे कलम, असा आहे;

(थ) "अर्ध-कुशल व्यवसाय" याचा अर्थ, त्याच्या कामगिरीनुसार, जो एखाद्या कुशल कर्मचाऱ्याच्या देखरेखीखाली किंवा मार्गदर्शनाखाली वापर केला जाण्यास सक्षम असलेल्या नोकरीवरील अनुभवातून मिळविलेल्या कौशल्यांचा वापर करणे ज्यासाठी आवश्यक असते असा व्यवसाय, असा आहे आणि यामध्ये कुशल व्यवसायावरील देखरेखीचा समावेश होतो;

(द) "कुशल व्यवसाय" याचा अर्थ, त्याच्या कामगिरीनुसार, ज्यात, नोकरीवरील अनुभवातून अथवा तांत्रिक किंवा व्यावसायिक संस्थेमधील प्रशिक्षणार्थी म्हणून प्रशिक्षणातून मिळविलेली कौशल्ये व सक्षमता यांचा अंतर्भाव असतो आणि जे करताना उपक्रमशीलता व विवेकबुध्दी यांची गरज असते असा व्यवसाय, असा आहे;

(ध) "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(न) "अकुशल व्यवसाय" याचा अर्थ, त्याच्या कामगिरीनुसार, ज्याकरिता केवळ कार्यचालन अनुभवाचा वापर करण्याची आवश्यकता असते आणि ज्यात, आणखी कौशल्याचा अंतर्भाव नसतो असा व्यवसाय, असा आहे;

(२) या नियमांमध्ये वापरलेले आणि यात व्याख्या न केलेले, परंतु संहितेमध्ये व्याख्या केलेले शब्द व संज्ञा यांना, संहितेन्वये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

प्रकरण-दोन
किमान वेतन.

३. वेतनाच्या किमान दराची गणना करण्याची रीत.- (१) कलम ६ च्या पोट-कलम (५) च्या प्रयोजनार्थ, वेतनाचा किमान दर, जे विशेष किंवा सर्वसाधारण आदेशाद्वारे, राज्य शासनाकडून स्वतंत्रपणे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे निकष विचारात घेऊन त्या आधारे दैनंदिन तत्वावर निश्चित करण्यात येईल:

परंतु, राज्य शासन, या संहिते अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे किमान वेतन दर निश्चित करणार नाही.

(२) जेव्हा दैनिक वेतनाचा दर निश्चित केला जातो तेव्हा, अशा रकमेस, एका तासाचा वेतन दर निश्चित करण्यासाठी आठने भागण्यात येईल आणि एका महिन्याच्या वेतनाचा दर निश्चित करण्यासाठी तिला सव्वीसने गुणन्यात येईल आणि अशा भागाकारामधील व गुणाकारामधील अर्धा किंवा त्यापेक्षा अधिक असलेला अपूर्णांक पुढच्या अंकामध्ये मिळवण्यात येईल आणि अर्ध्यापेक्षा कमी असलेला अपूर्णांक विचारात घेण्यात येणार नाही.

(३) सहा दिवसांपेक्षा कमी असलेल्या कामाच्या सप्ताहाच्या बाबतीत, अशाप्रकारे परिगणना केलेला किमान वेतनाचा तासाचा दर, दिवसाचे किमान वेतन काढण्यासाठी वापरण्यात येईल.

४. परिवर्ती महागाई भत्याची सुधारणा करण्याचा कालांतर.-
श्रम ब्यूरो, कामगार व रोजगार मंत्रालय , भारत सरकार यांनी प्रसिद्ध केलेली औद्योगिक कामगारांच्या सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक संख्या विचारात घेऊन, किमान वेतनावरील कर्मचाऱ्यांना प्रदेय असलेल्या परिवर्ती महागाई भत्त्याची सुधारणा करण्यासाठी प्रत्येक वर्षी १ एप्रिलपूर्वी एकदा व त्यानंतर दरवर्षी १ ऑक्टोबरपूर्वी, निर्वाह भत्त्याचा खर्च व सवलतीच्या दरातील अत्यावश्यक वस्तूंच्या बाबतीतील सवलतीचे रोख मूल्य यांची परिगणना करण्यात येईल.

५. जे प्रसामान्य कामकाजाचे दिवस ठरतील त्या कामाच्या तासांची संख्या.-
(१) ज्या कर्मचाऱ्याचा वेतन कालावधी दैनिक तत्वावर आधारित आहे त्या कर्मचाऱ्यासाठी जे प्रसामान्य कामकाजाचे दिवस ठरतील त्या कामाच्या तासांची संख्या, आठ तास असेल आणि विश्रांतीचे कालांतर, व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० (२०२० चा ३७) या अन्वये या संबंधात काढलेल्या अधिसूचनेनुसार असेल.

(२) ज्या कर्मचाऱ्याचा वेतन कालावधी दैनिक तत्वाव्यतिरिक्त इतर तत्वावर आधारित आहे, त्या कर्मचाऱ्यासाठी जे प्रसामान्य कामकाजाचे दिवस ठरतील त्या कामाच्या तासांची संख्या, अशा प्रकारे निश्चित करण्यात येईल की, सप्ताहातील कामाचे एकूण तास अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक असणार नाहीत.

६. विश्रांतीचा साप्ताहिक दिवस.- (१) या नियमाच्या तरतुदींस अधीन राहून, एखाद्या कर्मचाऱ्यास, प्रत्येक आठवड्यास, एक दिवसाची, किंवा यथास्थिती, एक दिवसापेक्षा अधिक दिवसांची विश्रांती (यात यापुढे ज्याचा उल्लेख,"विश्रांतीचे दिवस" असा केला आहे) घेण्याची मुभा देण्यात येईल, जो सहा दिवसांच्या आठवड्याच्या बाबतीत, साधारणपणे रविवार असेल आणि सहापेक्षा कमी दिवसांच्या आठवड्याच्या बाबतीत, साधारणपणे शनिवार व रविवारचा समावेश असेल, परंतु, नियोक्त्यास, कोणत्याही कर्मचाऱ्यासाठी किंवा कर्मचाऱ्यांच्या वर्गासाठी विश्रांतीचे दिवस म्हणून आठवड्याचे अन्य कोणतेही दिवस निश्चित करता येतील:

परंतु, सहा दिवसांच्या कामाच्या आठवड्यामधील, किंवा यथास्थिती, सहा दिवसांपेक्षा कमी दिवसांच्या कामाच्या आठवड्यामधील, आठवड्याचे उर्वरित दिवस, अशा कर्मचाऱ्यांसाठी भर पगारी विश्रांतीचे दिवस असतील:

परंतु आणखी असे की, जर एखाद्या कर्मचाऱ्याने, सहा दिवसांच्या आठवड्याच्या बाबतीत, सहा दिवसांपेक्षा कमी नसेल अशा सलग कालावधीसाठी, आणि यथास्थिती, सहापेक्षा कमी दिवसांच्या कामाच्या सप्ताहाच्या बाबतीत, कामाच्या दिवसांच्या करारनिविष्ट केलेल्या संख्येच्या सलग कालावधीकरिता, त्याच नियोक्त्याच्या अंतर्गत काम केले असेल तर, तो, या पोट-नियमान्वये विश्रांतीच्या दिवसांसाठी हक्कदार असेल:

परंतु तसेच, कर्मचाऱ्यास, विश्रांतीचे दिवस म्हणून निश्चित केलेल्या दिवसांची आणि विश्रांतीच्या दिवसांमधील त्यानंतरच्या कोणत्याही बदलाची माहिती, असा बदल अंमलात येण्यापूर्वी, नोकरीच्या ठिकाणामधील एखाद्या ठळक ठिकाणी तशा आशयाची नोटीस प्रदर्शित करून किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कळविण्यात येईल.

स्पष्टीकरण.- या पोट-नियमाच्या दुसऱ्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या आठवड्यामधील सहा दिवसांपेक्षा कमी नसलेला सलग कालावधी किंवा सहा दिवसांपेक्षा कमी नसलेला करारनिविष्ट सलग कालावधी किंवा कामाच्या दिवसांची करारनिविष्ट केलेली संख्या मोजण्याच्या प्रयोजनार्थ,-

(क) ज्या दिवशी कर्मचाऱ्याने कामासाठी उपस्थित राहणे आवश्यक असते, परंतु अशा दिवशी, उपस्थितीसाठी त्याला केवळ भत्ता दिला जातो, परंतु काम पुरविले जात नाही असा कोणताही दिवस;

(ख) ज्या दिवशी कर्मचाऱ्यास, औद्योगिक संबंध अधिनियम, २०२० (२०२० चा ३५) या अन्वये नुकसानभरपाईचे प्रदान केल्यावर, अपरिहार्य काम बंदी केलेली असते, असा कोणताही दिवस; आणि

(ग) सहा दिवसांच्या कालावधीमध्ये, किंवा यथास्थिती, आठवड्याच्या कामाच्या दिवसांच्या करारनिविष्ट संख्येतील कालावधीमध्ये, विश्रांतीच्या दिवसांच्या लगतपूर्वी, नियोक्त्याने कर्मचाऱ्यास वेतनासह किंवा वेतनाशिवाय, मंजूर केलेली कोणतीही रजा किंवा सुट्टी हे, ज्या दिवशी कर्मचाऱ्याने काम केलेले आहे ते दिवस असल्याचे मानण्यात येतील.

(२) अशा कोणत्याही कर्मचाऱ्यास, जर विश्रांतीच्या दिवसाच्या लगतपूर्वीच्या किंवा त्यानंतरच्या आठवड्यामधील कामाच्या दिवसांपैकी एका दिवशी संपूर्ण दिवसासाठी बदली विश्रांतीचा दिवस दिल्याशिवाय किंवा दिला जाणार असल्याशिवाय, त्यास, विश्रांतीच्या दिवशी काम करण्यास भाग पाडण्यात येणार नाही किंवा मुभा दिली जाणार नाही:

परंतु, असा कोणताही बदली दिवस दिला जाणार नाही, ज्याचा परिणाम, कर्मचारी, सुट्टीच्या दिवसाशिवाय संपूर्ण दिवसासाठी सलगपणे दहापेक्षा अधिक दिवसांसाठी काम करण्यात होईल.

(३) जेव्हा या नियमाच्या पूर्ववर्ती तरतुदींनुसार, कोणताही कर्मचारी, विश्रांतीच्या दिवशी काम करतो आणि त्यास विश्रांतीच्या दिवसापूर्वी किंवा त्यानंतर कामाच्या दिवसाच्या कोणत्याही दिवशी बदली विश्रांतीचा दिवस देण्यात आला असेल तेव्हा, कामाचे आठवड्याचे तास मोजण्याच्या प्रयोजनार्थ, असा विश्रांतीचा दिवस, ज्या आठवड्यामध्ये बदली विश्रांतीचा दिवस येतो त्या आठवड्यामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

(४) कर्मचाऱ्यास, विश्रांतीच्या दिवसासाठी, पूर्वीच्या कामाच्या दिवशी लागू असलेल्या दराने परिगणना केलेले वेतन मंजूर करण्यात येईल; आणि जेव्हा तो विश्रांतीच्या दिवशी काम करतो आणि त्याला बदली विश्रांतीचा दिवस देण्यात आलेला असेल तेव्हा, ज्या दिवशी त्याने काम केलेले असेल त्या विश्रांतीच्या दिवसासाठी त्याला अतिकालिक दराने वेतन आणि बदली विश्रांतीच्या दिवसासाठी, पूर्वीच्या कामाच्या दिवशी लागू असलेल्या दराने, वेतन प्रदान करण्यात येईल:

परंतु, सहा दिवसांच्या आठवड्याच्या बाबतीत, जेव्हा,-

(एक) संहितेन्वये अधिसूचित केल्याप्रमाणे, कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा किमान दर, वेतनाच्या किमान मासिक दरास, सव्वीसने भागून काढण्यात आलेला असेल तेव्हा; किंवा

(दोन) कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रत्यक्ष दैनिक दर, वेतनाच्या मासिक दरास सव्वीसने भागून काढण्यात आलेला असेल आणि असा वेतनाचा प्रत्यक्ष दैनिक दर, कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या अधिसूचित केलेल्या किमान दैनिक दरापेक्षा कमी नसेल तेव्हा, विश्रांतीच्या दिवसासाठी कोणतेही वेतन प्रदेय असणार नाही; आणि

(तीन) कर्मचाऱ्याने विश्रांतीच्या दिवशी काम केले असेल आणि त्याला बदली विश्रांतीचा दिवस देण्यात आला असेल तेव्हा, त्याने ज्या दिवशी काम केलेले असेल त्या विश्रांतीच्या दिवसासाठीच केवळ, त्याला प्रदेय असलेल्या वेतनाइतकी रक्कम, अतिकालिक दराने, त्याला प्रदान करण्यात येईल, ती वेतनाच्या सर्वसाधारण दराच्या दुपटीपेक्षा कमी असणार नाही.

आणि, जर वेतनाचा दैनिक दर, या परंतुकाच्या तरतुदींनुसार काढण्यात आलेला आहे किंवा कसे याबाबत कोणताही विवाद उद्भवला असेल तर, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य किंवा अधिकारिता असणारा प्रभारी अधिकारी, याबाबतीत त्यांच्याकडे केलेल्या अर्जावरून, संबंधित पक्षकारांना लेखी निवेदने करण्याची संधी दिल्यानंतर, त्यावर निर्णय करू शकेल:

परंतु आणखी असे की, तुकडा दर प्रणाली कामाच्या दर पद्धतीने विनियमित केलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, त्याने ज्या दिवशी काम केलेले असेल त्या विश्रांतीच्या दिवसासाठी त्याला अतिकालिक दराने वेतन आणि बदली विश्रांतीच्या दिवसासाठी, पूर्वीच्या कामाच्या दिवशी लागू असलेल्या दराने वेतन प्रदान करण्यात येईल.

स्पष्टीकरण.- या पोट-नियमांमधील, "पूर्वीचा कामाचा दिवस" याचा अर्थ, जो विश्रांतीच्या दिवसाच्या, किंवा यथास्थिती, बदली विश्रांतीच्या दिवसाच्या पूर्वीचा आहे असा, ज्या दिवशी कर्मचाऱ्याने काम केलेले आहे तो शेवटचा दिवस,असा आहे; आणि जेव्हा बदली विश्रांतीचा दिवस, विश्रांतीच्या दिवसाच्या लगतनंतरच्या दिवशी येत असेल तेव्हा, पूर्वीचा कामाचा दिवस याचा अर्थ, जो विश्रांतीच्या दिवसाच्या पूर्वीचा आहे असा, ज्या दिवशी कर्मचाऱ्याने काम केलेले आहे तो शेवटचा दिवस, असा आहे.

(५) या नियमाच्या तरतुदी, ज्यासाठी कर्मचारी अन्य कोणत्याही कायद्यान्वये किंवा कोणताही निवाडा, करारनामा किंवा सेवेचा करार यांच्या अटीं अन्वये हक्कदार असू शकेल अशा अधिक अनुकूल असलेल्या अटींना, कोणत्याही असल्यास, बाधक होण्यासाठी अंमलात येणार नाहीत, आणि अशा प्रकरणी, कर्मचारी, अधिक अनुकूल असलेल्या उपरोक्त अटींसाठीच केवळ हक्कदार असेल.

स्पष्टीकरण.- या नियमाच्या प्रयोजनार्थ,"आठवडा" याचा अर्थ, शनिवारी रात्री मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी, असा असेल.

७. रात्र पाळया.- जेव्हा एखाद्या नोकरीतील कर्मचारी, मध्यरात्रीनंतर एखाद्या पाळीवर काम करीत असेल तेव्हा,-

(क) या प्रकरणी, नियम ६ च्या प्रयोजनार्थ, संपूर्ण दिवसासाठी विश्रांतीचा दिवस याचा अर्थ, जेव्हा त्याची पाळी संपते त्या वेळेपासून सुरू होणारा सलग चोवीस तासांचा कालावधी, असा असेल; आणि

(ख) अशा प्रकरणी, पुढील दिवस हा, जेव्हा अशी पाळी संपते त्या वेळेपासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी असल्याचे मानण्यात येईल, आणि ज्या कालावधीत असा कर्मचारी कामामध्ये गुंतलेला होता ते मध्यरात्रीनंतरचे तास, आधीच्या दिवसासाठी मोजण्यात येतील.

८. कलम १३ च्या पोट-कलम (२) च्या प्रयोजनांसाठी मर्यादा व शर्ती.- कलम १३ च्या पोट-कलम (२) अन्वये कर्मचाऱ्यांच्या विवक्षित प्रवर्गांसाठी कामाच्या तासांची संख्या, नियम ५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रसामान्य कामाच्या तासांपेक्षा अधिक असणार नाही:

परंतु, या कर्मचाऱ्यांच्या या प्रवर्गांचा अतिकाल, कलम १४ नुसार असेल.

९. दीर्घ वेतन कालावधी.- कलम १४ अन्वये वेतनाच्या किमान दराच्या प्रयोजनार्थ, दीर्घ वेतन कालावधी, एक महिना इतका असेल.

प्रकरण-तीन
वेतन प्रदान.

१०. कलम १० च्या परंतुकाच्या खंड (दोन) खालील परिस्थिती.- जर कर्मचाऱ्याने नोकरीच्या शर्तीनुसार अंशकालिक तत्त्वावर काम करण्याचे मान्य केले असेल त्याबाबतीत, तो कलम १० अन्वये प्रसामान्य कामाच्या पूर्ण दिवसासाठी वेतन मिळण्यास हक्कदार असणार नाही किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये असे वेतन मिळविण्यास हक्कदार असणार नाही.

११. कलम १८ च्या पोट-कलम (४) खालील वसुली.- जेव्हा कलम १८ च्या पोट-कलम (२) अन्वये प्राधिकृत केलेल्या एकूण वजावटी, कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक असतील तेव्हा, अधिकची रक्कम, पुढे ओढण्यात येईल आणि अनुवर्ती वेतन कालावधीच्या, किंवा यथास्थिती, वेतन कालावधींच्या वेतनातून, ती अशा हप्त्यांमध्ये वसूल करण्यात येईल की जेणेकरून, कोणत्याही महिन्यातील वसुली, त्या महिन्यातील कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही.

१२. कलम १९ च्या पोट-कलम (१) खालील प्राधिकारी.- संबंधित कर्मचाऱ्याच्या कामाच्या ठिकाणावर अधिकारिता असणारा विभागीय स्तरावरील अपर कामगार आयुक्त, किंवा यथास्थिती, कामगार उपआयुक्त हा, कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, कृती किंवा अकृती मान्य करणारा प्राधिकारी असेल.

१३. कलम १९ च्या पोट-कलम (२) अन्वये नोटीस प्रदर्शित करण्याची रीत.- कलम १९ च्या पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली नोटीस, नोकरी करीत असलेल्या कामाच्या जागांमधील ठळक जागी, मराठी, हिंदी आणि इंग्रजीमध्ये प्रदर्शित करण्यात येईल, जेणेकरून प्रत्येक संबंधित कर्मचाऱ्यास, नोटीसीचा मजकूर सहजपणे वाचणे शक्य होईल. नोटीसीची एक प्रत, अधिकारिता असणाऱ्या निरीक्षक-तथा-सुविधाकारास, एकतर प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने पाठवण्यात येईल.

१४. कलम १९ च्या पोट-कलम (३) खालील कार्यपद्धती.- (१) कलम १९ च्या पोट-कलम (३) नुसार, नियोक्ता, संबंधित कर्मचाऱ्याला, कर्मचाऱ्याने केलेल्या कृतींचा व अकृतींचा तपशील त्यात विनिर्दिष्ट करून व दंड लादण्याची ताकीद देऊन, सात दिवसांच्या आत कारणे दाखवण्यासाठी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा लेखी स्वरूपात सूचना देईल.

(२) दोषारोप सिद्ध झाल्यावर, अपचारी कर्मचाऱ्यावर दंड लादण्यात येईल.

(३) विनिर्दिष्ट कालावधीत कर्मचाऱ्याकडून कोणतेही उत्तर न मिळाल्यास, दंड लादण्यात येईल आणि असा दंड लादल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, त्याबद्दल कर्मचाऱ्याला कळविण्यात येईल.

१५. वजावटीची पूर्वसूचना.- (१) जेव्हा नियोक्त्याचा, कलम २० च्या पोट-कलम (२) च्या परंतुकानुसार कोणतीही वजावट करण्याचा इरादा असेल तेव्हा, नियोक्ता, अशी वजावट करण्याच्या आपल्या इराद्याबद्दल संबंधित कर्मचाऱ्याला इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा लेखी स्वरूपात कळवील आणि सात दिवसांच्या कालावधीत त्याचे उत्तर मागवील आणि दोषारोप सिद्ध झाल्यावर, कलम १८ च्या पोट-कलम (३) नुसार कर्मचाऱ्याच्या वेतनातून वजावट करण्यात येईल.

(२) जर संबंधित कर्मचाऱ्याकडून सात दिवसांच्या आत कोणतेही उत्तर मिळाले नाही तर, नियोक्ता, वेतनातून अशी वजावट करील आणि अशा वजावटीच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत त्याबद्दल कर्मचाऱ्याला कळवील.

१६. कलम २१ च्या पोट-कलम (२) खालील वजावटीची कार्यपद्धती.- कलम २१ च्या पोट-कलम (१) अन्वये नुकसानीसाठी किंवा हानीसाठी कर्मचाऱ्याच्या वेतनातून वजावट करण्याची इच्छा असणारा कोणताही नियोक्ता,-

(एक) अभिरक्षेत ठेवण्यासाठी कर्मचाऱ्याकडे स्पष्टपणे सोपविलेल्या मालाच्या नुकसानीचे किंवा हानीचे मूल्य किंवा ज्याकरिता त्याने हिशोब देणे आवश्यक आहे त्या रकमेचे नुकसान आणि असे नुकसान किंवा हानी, प्रत्यक्षपणे कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे किंवा कसूरीमुळे घडून आली आहे हे लेखी स्वरूपात कर्मचाऱ्याला स्पष्ट करील; आणि

(दोन) सात दिवसांच्या कालावधीत कर्मचाऱ्यास कोणतेही स्पष्टीकरण सादर करण्याची संधी देईल आणि त्यानंतर, जर नुकसान किंवा हानी झालेली असेल तर, त्याची वजावट करील, आणि अशा वजावटीच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत, कर्मचाऱ्यास कळविण्यात येईल.

१७. कलम २३ अन्वये अग्रिम रकमेची वसुली करण्यासंबंधीच्या शर्ती.-

(एक) कलम २३ च्या खंड (ख) अन्वये रोजगार सुरू झाल्यानंतर कर्मचाऱ्यास दिलेल्या अग्रिम रकमांची, किंवा यथास्थिती,

(दोन) कलम २३ च्या खंड (ग) अन्वये आधीच अर्जित न केलेल्या कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या अग्रिमाची,

वसुली, नियोक्त्याने निर्धारित केलेल्या हप्त्यांमध्ये, संबंधित कर्मचाऱ्याच्या वेतनातून नियोक्त्याकडून वसूल करण्यात येईल, जेणेकरून, वेतन कालावधीमधील कोणताही हप्ता किंवा सर्व हप्ते, त्या वेतन कालावधीत, नियम ११ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, कर्मचाऱ्याच्या वेतनाच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाहीत आणि अशा वसुलीचा तपशील, नमुना- चारमध्ये ठेवलेल्या नोंदवहीमध्ये नोंदवण्यात येईल.

१८. कलम २४ खालील वजावट.- कर्मचाऱ्याला दिलेल्या कर्जाची आणि त्यावरील देय व्याजाची वसुली करण्याच्या वजावटी, अशी कर्जे कोणत्या मर्यादेपर्यंत दिली जाऊ शकतात आणि त्यावर प्रदेय असलेला व्याजाचा दर काय असेल याचे नियमन करणाऱ्या राज्य शासनाच्या प्रचलित सूचना किंवा मार्गदर्शक तत्त्वांनुसार असतील.

प्रकरण- चार
राज्य सल्लागार मंडळ.

१९. मंडळाची रचना.- राज्य शासनाकडून नामनिर्देशित करण्यात यावयाच्या व्यक्तींचा समावेश असणारे मंडळ, कलम ४२ च्या पोट-कलम (४) अन्वये राज्य शासनाद्वारे घटीत करण्यात येईल.

२०. मंडळाची बैठक.- अध्यक्ष, नियम २२ च्या तरतुदींस अधीन राहून, त्याला योग्य वाटेल अशा कोणत्याही वेळी, मंडळाची बैठक बोलावू शकेल:

परंतु, सदस्यांपैकी निम्म्यापेक्षा कमी नसतील अशा सदस्यांनी लेखी मागणी केल्यावर, अध्यक्ष, अशी मागणी मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, बैठक बोलावील.

२१. बैठकींची नोटीस.- अध्यक्ष, प्रत्येक बैठकीची तारीख, वेळ व ठिकाण निश्चित करील आणि बैठकीत करावयाच्या कामकाजाच्या यादीसह उपरोक्त तपशिलाचा अंतर्भाव असणारी लेखी स्वरूपातील नोटीस, अशा बैठकीसाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी, किमान पंधरा दिवस आधी, शीघ्र डाकेने किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रत्येक सदस्यास पाठवण्यात येईल:

परंतु, आकस्मिक बैठकीच्या बाबतीत, प्रत्येक सदस्यास, केवळ सात दिवसांची नोटीस देता येईल.

२२. अध्यक्षांची कार्ये.- अध्यक्ष,-

(एक) मंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवतील:

परंतु, कोणत्याही अध्यक्षांच्या अनुपस्थित, सदस्यांनी, त्यांच्यामधून बहुमताने निवडलेला सदस्य, बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल;

(दोन) मंडळाच्या प्रत्येक बैठकीची कार्यसूची ठरवील;

(तीन) जेव्हा मंडळाच्या बैठकीमध्ये, कोणताही विषय मतदानाने ठरवावयाचा असेल तर, त्याबाबतीत, मतदान घेईल आणि बैठकीतील गुप्त मतदानाची मोजणी करील किंवा मोजणी करण्याची व्यवस्था करील;

(चार) राज्य शासन, वेळोवेळी नेमून देईल अशी इतर कार्ये पार पाडील.

२३. गणपूर्ती.- किमान एक-तृतीयांश सदस्य आणि नियोक्ते व कर्मचारी या दोघांचा प्रत्येकी किमान एक प्रतिनिधी सदस्य उपस्थित असल्याशिवाय, कोणत्याही बैठकीत कोणतेही कामकाज करण्यात येणार नाही:

परंतु, जर कोणत्याही बैठकीत एक-तृतीयांशपेक्षा कमी सदस्य उपस्थित असतील तर, अध्यक्ष, जी मूळ बैठकीच्या तारखेपासून सात दिवसांपेक्षा नंतरची नसेल अशा तारखेपर्यंत बैठक तहकूब करू शकेल आणि त्यानंतर, उपस्थित सदस्यांची संख्या विचारात न घेता, अशा तहकूब केलेल्या बैठकीत कामकाज करणे कायदेशीर असेल:

परंतु आणखी असे की, तहकूब केलेल्या अशा बैठकीची तारीख, वेळ व ठिकाण, सर्व सदस्यांना, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने कळविण्यात येईल.

२४. मंडळाचे कामकाज पार पाडणे.- मंडळाचे सर्व कामकाज, मंडळाच्या बैठकीत विचारात घेण्यात येईल, आणि उपस्थित असणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास अशा प्रसंगी, अध्यक्षास, निर्णायक मत असेल:

परंतु, अध्यक्षास, जर त्याला योग्य वाटले तर, असा निदेश देता येईल की, कोणतीही बाब, आवश्यक कागदपत्रे, प्रसृत करून आणि सदस्यांची लेखी मते मिळवून त्याद्वारे ठरवण्यात येईल:

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकाअन्वये कोणत्याही बाबीवरील निर्णय, सदस्यांच्या दोन-तृतीयांशपेक्षा कमी नसेल इतक्या बहुमताने पाठिंबा असल्याशिवाय घेण्यात येणार नाही.

२५. मतदान पद्धती.- मंडळांमधील मतदान, सर्वसाधारणपणे हात वर करून करण्यात येईल, परंतु जर कोणत्याही सदस्याने मतपत्रिकेद्वारे मतदान घेण्याची विचारणा केली तर किंवा जर अध्यक्षाने तसे ठरविले तर, गुप्त मतदान पत्रिकेद्वारे मतदान घेण्यात येईल आणि अध्यक्ष ठरवील अशा रीतीने ते घेण्यात येईल.

२६. बैठकींची कार्यवाही.- (१) इतर गोष्टींबरोबरच बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे दर्शविणारी मंडळाच्या प्रत्येक बैठकीची कार्यवाही, बैठकीनंतर शक्य तितक्या लवकर आणि कोणत्याही बाबतीत, पुढील बैठकीपूर्वी सात दिवसांपेक्षा कमी नसेल अशा कालावधीत प्रत्येक सदस्यास व राज्य शासनास पाठवण्यात येईल.

(२) मंडळाच्या प्रत्येक बैठकीची कार्यवाही, आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, एकतर कोणत्याही फेरबदलांशिवाय किंवा असल्यास, अशा फेरबदलांसह, पुढील बैठकीत कायम करण्यात येईल.

२७. साक्षीदारांना समन्स पाठवणे व दस्तावेज सादर करणे.- (१) अध्यक्षास, त्याचे कर्तव्य पार पाडण्याच्या ओघात, आवश्यक असल्यास, कोणत्याही व्यक्तीला साक्षीदार म्हणून उपस्थित राहण्यासाठी समन्स पाठवता येईल आणि कोणत्याही व्यक्तीस, कोणताही दस्तावेज सादर करण्यास फर्मावता येईल.

(२) ज्या व्यक्तीस समन्स पाठवलेले आहे आणि जी मंडळासमोर साक्षीदार म्हणून उपस्थित राहते अशी प्रत्येक व्यक्ती, तिने केलेल्या खर्चासाठी, एखाद्या दिवाणी न्यायालयासमोर उपस्थित राहणाऱ्या साक्षीदारांना भत्ता प्रदान करण्यासाठी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या दरानुसार, भत्ता मिळण्यासाठी हक्कदार असेल.

२८. मंडळाच्या सदस्यांचा पदावधी.- (१) शासकीय सदस्यांव्यतिरिक्त, मंडळाच्या अध्यक्षाचा किंवा सदस्यांचा पदावधी, साधारणपणे, कलम ४२ च्या पोट-कलम (६) अन्वये त्याच्या नियुक्तीच्या, किंवा यथास्थिति, नामनिर्देशनाच्या दिनांकापासून प्रारंभ होणारा तीन वर्षे इतका असेल:

परंतु, असा अध्यक्ष किंवा सदस्य, उक्त तीन वर्षांचा उक्त कालावधी समाप्त झाला असला तरी, त्याच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती, किंवा यथास्थिति, नामनिर्देशन करण्यात येईपर्यंत, नियमितपणे पद धारण करील.

(२) नैमित्तिक रिक्त पद भरण्यासाठी, नामनिर्देशित केलेला मंडळाचा स्वतंत्र सदस्य, ज्या सदस्याच्या जागी त्या स्वतंत्र सदस्याला नामनिर्देशित केलेले असेल त्या सदस्याच्या पदावधीच्या उर्वरित कालावधीसाठी किंवा नियमित सदस्य पदावर रुजू होईपर्यंत, पद धारण करील.
(३) मंडळाचे शासकीय सदस्य, त्यांच्या जागी, अशा अन्य शासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येईपर्यंत, पद धारण करतील.
(४) पोट-नियम (१), (२) व (३) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मंडळाचे सदस्य, राज्य शासनाची मर्जी असेपर्यंतच्या कालावधीसाठी, पद धारण करतील.

२९. प्रवास भत्ता.- (१) मंडळाच्या शासकीय सदस्याच्या प्रवास भत्याचे, शासकीय कर्तव्यावर असताना केलेल्या प्रवासासाठी त्यांना लागू असलेल्या नियमांनुसार विनियमन करण्यात येईल आणि वेतन प्रदान करणाऱ्या प्राधिकरणाद्वारे तो प्रदान करण्यात येईल.
(२) मंडळाचा किंवा समितीचा अध्यक्ष व प्रत्येक अशासकीय सदस्य, त्याची कर्तव्य करण्याच्या संबंधात त्याने केलेल्या कोणत्याही प्रवासासाठी, राज्य शासनाच्या गट-अ अधिकाऱ्यांना लागू असलेल्या दराने व शर्तींस अधीन राहून, प्रवास व निवास भत्ता आहरित करण्यास हक्कदार असेल.
स्पष्टीकरण.- या नियमाच्या प्रयोजनार्थ, "शासकीय सदस्य" या संज्ञेचा अर्थ, त्या क्षमतेत मंडळाचे सदस्य म्हणून कामकाज पाहणारे नियमित शासकीय अधिकारी, असा आहे आणि "अशासकीय सदस्य" याचा अर्थ, जो शासकीय सदस्य नाही असा सदस्य, असा आहे.

३०. अधिकारी व कर्मचारी.- राज्य शासन, मंडळाच्या कामकाजासाठी त्याला आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, सहायक कामगार आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला सचिव तसेच आवश्यक कर्मचारी मंडळास पुरवील.

३१. मंडळाच्या सदस्यांची पुन:नामनिर्देशन करण्याची पात्रता.- एखादा मावळता अशासकीय सदस्य, एकूण दोन पदावधींपेक्षा अधिक नसेल अशा पदावधींसाठी मंडळाच्या सदस्यत्वाकरिता पुन: नामनिर्देशित करण्यास पात्र असेल.

३२. मंडळाचे अध्यक्ष आणि सदस्यांचा राजीनामा.- (१) शासकीय सदस्यांव्यतिरिक्त मंडळाचा सदस्य, अध्यक्षास लेखी नोटीस देऊन त्याच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकेल आणि अध्यक्ष, राज्य शासनास उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे राजीनामा देऊ शकेल.
(२) त्याची स्वीकृती कळविल्याच्या दिनांकापासून किंवा राजीनाम्याच्या दिनांकापासून तीस दिवस समाप्त झाल्यावर, यापैकी जे आधी घडेल तेव्हापासून राजीनामा अंमलात येईल.
(३) जेव्हा मंडळाच्या सदस्यत्वामध्ये, एखादे पद रिक्त होईल किंवा रिक्त होण्याचा संभव असेल तेव्हा, अध्यक्ष, राज्य शासनास तात्काळ अहवाल सादर करील आणि राज्य शासन, संहितेच्या तरतुदींनुसार रिक्त पद भरण्यासाठी उपायोजना करील.

३३. सदस्यत्वाची समाप्ती.- जर मंडळाचा एखादा सदस्य अध्यक्षास पूर्वसूचना न देता, सलग तीन बैठकींना अनुपस्थित राहिल्यास त्याचे सदस्यत्व संपुष्टात येईल. अध्यक्ष, अशा समाप्तीचा अहवाल, राज्य शासनास सादर करील. ज्या व्यक्तीचे सदस्यत्व संपुष्टात येत आहे त्या व्यक्तीस देखील कळविण्यात येईल.

३४. अपात्रता.- (१) एखादी व्यक्ती,-

(एक) जर तिला एखाद्या सक्षम न्यायालयाने, ती विकल मनाची असल्याचे घोषित केले असेल तर; किंवा

(दोन) जर ती अविमुक्त नादार झाली असेल तर; किंवा

(तीन) जर संहितेच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर, तिला नैतिक अध:पतनाचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधाबद्दल दोषीसिद्ध ठरविण्यात आलेले असेल तर,

तिला, मंडळाची सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यासाठी किंवा होण्यासाठी अपात्र ठरवण्यात येईल.
(२) जर पोट-नियम (१) खालील अपात्रता घडून आलेली आहे किंवा कसे या संबंधात कोणताही प्रश्न उद्भवला तर, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

प्रकरण-पाच
देणी, हक्क मागण्या, इत्यादींचे प्रदान.

३५. कलम ४४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (क) खालील प्रदान.- (१) (क) प्रत्येक कर्मचारी, त्याच्या खात्यात जमा असणारी रक्कम, प्रदेय झाली असेल त्यापूर्वी किंवा जेव्हा रक्कम प्रदेय झाली असेल तेव्हा, ती प्रदान करण्यात येण्यापूर्वी, त्याचा मृत्यू झाल्यास, अशा प्रसंगी त्याच्या खात्यात जमा असलेली रक्कम मिळण्याचा हक्क प्रदान करणाऱ्या व्यक्तीला नामनिर्देशित करणारे **नमुना- सात** मधील घोषणापत्र प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करील.

(ख) जर नामनिर्देशन करण्याच्या वेळी कर्मचाऱ्यास कुटुंब असेल तर, पतीच्या किंवा पत्नीच्या नावाने अथवा पतीला किंवा पत्नीला अधिमान्यता देऊन त्यानंतर त्याच्या कुटुंबातील एक किंवा अधिक सदस्यांच्या नावे नामनिर्देशन करण्यात येईल:

परंतु, कुटुंब असणाऱ्या कर्मचाऱ्याने, त्याच्या कुटुंबातील सदस्यांव्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीच्या नावाने केलेले नामनिर्देशन अवैध ठरेल:

परंतु आणखी असे की, कर्मचाऱ्याचा विवाह झाल्यानंतर, त्याच्या पत्नीच्या/पतीच्या नावाचा समावेश असलेले, त्याच्या/तिच्या नामनिर्देशितींना प्रदेय असलेली रक्कम किंवा हिस्सा विनिर्दिष्ट करणारे नवीन नामनिर्देशन करण्यात येईल. अशा विवाहापूर्वी केलेले नामनिर्देशन रद्द असल्याचे मानण्यात येईल.

(ग) जेव्हा एखाद्या अज्ञान व्यक्तीचे नामनिर्देशन संपूर्णत: किंवा अंशत: केले जाते, तेव्हा कर्मचाऱ्यास, त्याच्या कुटुंबातील सज्ञान व्यक्तीस नामनिर्देशित व्यक्तीस पालक म्हणून नियुक्त करता येईल अथवा जेव्हा कुटुंबामध्ये कोणतीही सज्ञान व्यक्ती नसेल तेव्हा, त्यास, त्याच्या स्वेच्छा अधिकारात, अन्य कोणत्याही व्यक्तीस अज्ञान नामनिर्देशित व्यक्तीची पालक म्हणून नियुक्ती करता येईल.

(घ) जर कर्मचाऱ्याने, एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले असेल तर, तो, त्याच्या खात्यात जी जमा असेल त्या संपूर्ण रकमेची विल्हेवाट करता यावी म्हणून, त्याच्या स्वेच्छा अधिकारात, त्याच्या प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तींना प्रदेय असलेली रक्कम किंवा हिस्सा नामनिर्देशनामध्ये, विनिर्दिष्ट करील.

(२) जेव्हा संहितेअन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास देय असलेली कोणतीही रक्कम, त्याचा मृत्यू झाल्यानंतर किंवा त्याचा ठावठिकाणा लागत नसेल अशा कारणावरून देय होते तेव्हा, आणि रक्कम प्रदेय झाली असेल त्या दिनांकापासून तीन महिने समाप्त होईपर्यंत कर्मचाऱ्याच्या नामनिर्देशित व्यक्तींना रक्कम प्रदान करता येऊ शकत नसेल तेव्हा, नियोक्त्याद्वारे, अशी रक्कम अधिकारिता असणाऱ्या सहायक कामगार आयुक्ताकडे जमा करण्यात येईल, तो, अशी रक्कम, त्याच्याकडे ती अशा प्रकारे ज्या दिनांकास जमा केली होती त्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत, कर्मचाऱ्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तींची ओळख पटवल्यानंतर, त्यांना संवितरित करील.

३६. कलम ४४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खालील संवितरित न केलेल्या देय रकमा जमा करणे.- (१) जेव्हा संहितेअन्वये एखाद्या कर्मचाऱ्यास प्रदेय असलेली कोणतीही रक्कम, एकतर अशा कर्मचाऱ्याकडून कोणालाही नामनिर्देशित करण्यात आलेले नाही या कारणावरून किंवा अन्य कोणत्याही कारणासाठी, संवितरित न करता राहिलेली असेल तेव्हा, अशी रक्कम प्रदेय झाली असेल त्या दिनांकापासून सहा महिने समाप्त होईपर्यंत कर्मचाऱ्याच्या कोणत्याही नामनिर्देशित व्यक्तीस प्रदान केली जाऊ शकत नाही, अशा सर्व रकमा, नियोक्त्याकडून, सहा महिन्यांच्या उक्त कालावधीच्या अखेरच्या दिवसानंतर पंधरा दिवस समाप्त होण्यापूर्वी आदेशामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिकारिता असणाऱ्या सहायक कामगार आयुक्ताकडे जमा करण्यात येतील.

(२) पोट-नियम (१) अन्वये जमा करावयाची रक्कम, नियोक्त्याकडून, बँक हस्तांतरणामार्फत किंवा अधिकारिता असणाऱ्या अशा सहायक कामगार आयुक्ताच्या नावे काढलेल्या भारतातील कोणत्याही अनुसूचित बँकेकडून घेतलेल्या रेखांकित धनाकर्षामार्फत, जमा करण्यात येईल.

३७. कलम ४४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ख) खालील संवितरित न केलेल्या देय रकमांसंबंधी कार्यवाही करण्याची रीत.- (१) अधिकारिता असणाऱ्या सहायक कामगार आयुक्ताकडे जमा केलेली, नियम ३६ च्या पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम (या नियमांमध्ये, यात यापुढे जिचा निर्देश, "रक्कम" असा केला आहे), त्याच्याकडे राहील आणि ती, राज्य शासनाच्या रोख्यांमध्ये गुंतवण्यात येईल अथवा एखाद्या राष्ट्रीयकृत बँकेमध्ये नियत ठेव म्हणून जमा करण्यात येईल.

(२) राज्य शासनाने नियुक्त केलेला प्राधिकारी, शक्य होईल तितक्या लवकर, त्यास पर्याप्त वाटेल असा, रकमेशी संबंधित असेल असा तपशील अंतर्भूत असणारी नोटीस, किमान पंधरा दिवसाच्या आत, माहितीसाठी सूचना फलकावर प्रदर्शित करील आणि अशी नोटीस, राज्य शासनाच्या संकेतस्थळावर किंवा शासकीय राजपत्रामध्ये देखील प्रसिद्ध करील तसेच संवितरित न केलेले वेतन ज्या क्षेत्रामध्ये अर्जित केले होते त्या क्षेत्रामधील सर्वसाधारणपणे समजल्या जाणाऱ्या देशी भाषेतील कोणत्याही दोन स्थानिक वृत्तपत्रांमध्ये देखील प्रसिद्ध करील आणि कर्मचारी कायमस्वरूपी राहत असलेल्या क्षेत्रामध्ये देशी भाषेतील कोणत्याही दोन वृत्तपत्रांमध्ये देखील प्रसिद्ध करील.

(३) पोट-नियम (४) च्या तरतुदीस अधीन राहून, अधिकारिता असणारा सहायक कामगार आयुक्त, नामनिर्देशित व्यक्तीला, किंवा यथास्थिति, जिने अशा रकमेची हक्कमागणी केलेली आहे त्या व्यक्तीला, बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, अधिकारिता असणाऱ्या अशा सहायक कामगार आयुक्ताने जिच्या नावे रक्कम प्रदान करण्याचा निर्णय दिला असेल त्या व्यक्तीला, रक्कम देईल.
(४) जर संवितरित न केलेली रक्कम, प्रसिद्धीनंतर सात वर्षांच्या कालावधीसाठी हक्कमागणी न करता राहिलेली असेल तर, या बाबतीत, राज्य शासन, वेळोवेळी निर्देश देईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रकरण - सहा
नमुने, नोंदवह्या व वेतन चिठ्ठी.

३८. हक्क मागणीच्या एकल अर्जाचा नमुना.- (१) एकाच आस्थापनेत काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही संख्येच्या किंवा गटाच्या वतीने किंवा बाबतीत, ज्यामध्ये एकाच वेतन कालावधीशी संबंधित असलेल्या त्यांच्या हक्क मागण्या किंवा भेदभावाच्या कोणत्याही घटना असलेला एकच अर्ज, नमुना दोनमध्ये, विनिर्दिष्ट केलेल्या दस्तऐवजांसह, संहितेच्या तरतुदींन्वये उद्भवणाऱ्या हक्क मागण्यांची सुनावणी करण्याकरिता व त्या निर्धारित करण्यासाठी कलम ४५ च्या पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या प्राधिकरणासमोर, प्रत्यक्षपणे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने उक्त नमुन्यामध्ये कलम ४५ च्या पोट-कलम (५) अन्वये दाखल करता येईल.
(२) कलम ४५ च्या पोट-कलम (५) खालील अर्ज प्राप्त झाल्यावर, प्राधिकरण, सर्व संबंधित दस्तऐवज व साक्षीदार, कोणतेही असल्यास, यांसह नमुना आठच्या भाग -अ मधील नोटीसमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास त्याच्यासमोर हजर राहण्यासाठी ती नोटीस, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने नियोक्त्यावर बजावील आणि असा विनिर्दिष्ट केलेला दिनांक अर्जदारास कळवील.
(३) जर नियोक्ता किंवा त्याचा प्रतिनिधी, विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास हजर राहण्यास कसूर करील तर, प्राधिकरण, अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व निर्णय घेईल.
(४) अर्जदार किंवा त्याचा प्रतिनिधी कोणतेही वाजवी कारण आगाऊ सादर न करता नमूद केलेल्या तारखेस अनुपस्थित राहिल्यास, प्राधिकरण अर्ज फेटाळू शकते.

३९. अपील.- (१) कलम ४५ च्या पोट-कलम (२) अन्वये प्राधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, **नमुना-तीन** मध्ये अपीलकाराने नमूद केलेल्या दस्तऐवजांसह इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने, अधिकारिता असणाऱ्या अपील प्राधिकाऱ्याकडे, कलम ४९ च्या पोट-कलम (१) अन्वये उक्त नमुन्यामध्ये अपील दाखल करता येईल:

परंतु, जर अपीलकाराने अपील दाखल करण्याच्या वेळी, हक्क मागणी केलेली रक्कम, अपिलीय प्राधिकाऱ्याकडे जमा केलेली नसेल तर, नियोक्त्याने केलेले कोणतेही अपील, दाखल करून घेण्यात येणार नाही.

(२) जेव्हा कलम ४९ च्या पोट-कलम (१) खालील अपील दाखल करून घेतले जाते तेव्हा, अपिलीय प्राधिकारी, नोटीसीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास, त्याच्यासमोर उपस्थित राहण्यासाठी **नमुना-आठच्या भाग- ब** मधील नोटीस, इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा शीघ्र डाकेने प्रतिवादीस बजावील आणि अशा प्रकारे विनिर्दिष्ट केलेला दिनांक अपीलकाराला कळवील.
(३) अपिलीय प्राधिकारी, अपीलकाराची व प्रतिवादीची सुनावणी घेतल्यानंतर, आदेशाद्वारे अपीलावर निर्णय करील.
(४) जेव्हा नियोक्ता किंवा त्यांचा प्रतिनिधी, विनिर्दिष्ट तारखेला हजर राहण्यात कसूर करील तेव्हा त्याबाबत, प्राधिकरण, अर्जाची एकतर्फी सुनावणी घेईल व त्यावर निर्णय करील.
(५) जेव्हा अर्जदार किंवा त्यांचा प्रतिनिधी, विनिर्दिष्ट तारखेला हजर राहण्यात कसूर करील तेव्हा त्याबाबत, प्राधिकरण, अपील खारीज करू शकेल.

४०. नोंदवह्यांचा नमुना.- (१) ज्या आस्थापनेस ही संहिता लागू होते, त्या आस्थापनेचा प्रत्येक नियोक्ता, संहितेच्या कलम ५० च्या पोट-कलम (१) अन्वये, या नियमांसोबत जोडलेल्या नमुन्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा भौतिक स्वरूपात पुढील नोंदवह्या ठेवील:—
(एक) नमुना एक मध्ये कर्मचारी नोंदवही,
(दोन) नमुना चार मध्ये वेतन, अतिकालिक वेतन, दंड आणि नुकसान व हानीसाठी वजावटी यांची नोंदवही,
(तीन) नमुना नऊ मध्ये उपस्थिती नोंदवही-नि-हजेरी पत्रक.
(२) कलम १९ च्या पोट-कलम (८) मध्ये निर्दिष्ट केलेले सर्व दंड व त्यांची सर्व वसुली, या नियमांसोबत जोडलेल्या नमुना चार मध्ये, नियोक्त्याने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा भौतिक स्वरूपात ठेवावयाच्या नोंदवहीत नोंदविण्यात येईल, आणि उक्त पोट-कलम (८) मध्ये निर्दिष्ट केलेला प्राधिकारी, महाराष्ट्र राज्याचा कामगार आयुक्त असेल.

(३) कलम २१ च्या पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेल्या सर्व कपाती व त्यांची सर्व वसुली, या नियमांसोबत जोडलेल्या नमुना चार मध्ये, नियोक्त्याने इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा भौतिक स्वरूपात ठेवावयाच्या नोंदवहीत नोंदविण्यात येईल.
(४) या नियमांन्वये ठेवणे आवश्यक असलेल्या सर्व नोंदवह्या, त्यामधील शेवटची नोंद केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी जतन करून ठेवण्यात येतील.

४१. वेतन चिठ्ठी.- प्रत्येक नियोक्ता, संहितेच्या कलम ५० च्या पोट-कलम (३) अन्वये, वेतन देण्याच्या दिवशी किंवा त्यापूर्वी, कर्मचाऱ्यांना, नमुना चार मध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा अन्य प्रकारे वेतन चिठ्ठ्या देईल.

४२. कलम ५६ च्या पोट-कलम (१) अन्वये अपराधांचे प्रशमन करण्याची रीत.- (१) कलम ५६ च्या पोट-कलम (१) अन्वये अपराधांचे प्रशमन करण्यास इच्छुक असलेली आरोपी व्यक्ती, उक्त पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेल्या राजपत्रित अधिकाऱ्याकडे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा प्रत्यक्षपणे **नमुना-सहा च्या भाग - अ मध्ये** अर्ज करू शकेल.
(२) पोट-नियम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला राजपत्रित अधिकारी, असा अर्ज प्राप्त झाल्यावर, असा अपराध संहितेअन्वये प्रशमन करण्यायोग्य आहे किंवा नाही यासंबंधी स्वतःची खात्री करील आणि जर अपराध प्रशमन करण्यायोग्य असेल आणि आरोपी व्यक्ती प्रशमन करण्यास सहमत असेल तर, अशा अधिकाऱ्याने काढलेल्या प्रशमन आदेशाच्या तीस दिवसांच्या आत, आरोपीने प्रदान करावयाच्या, संहितेअन्वये अशा अपराधासाठी तरतूद केलेल्या कमाल दंडाच्या पन्नास टक्के रकमेस अपराधाचे प्रशमन करील.
(३) प्रशमन अधिकारी, प्रशमनाची रक्कम मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत, प्रशमन नोटीसीचे अनुपालन करताना ज्या व्यक्तीकडून अशी रक्कम प्राप्त झालेली आहे, अशा व्यक्तीला **नमुना सहाच्या भाग-ब** मध्ये प्रशमन प्रमाणपत्र देईल.
(४) जेव्हा अशी नोटीस दिलेली व्यक्ती, प्रशमन अधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत प्रशमनाची रक्कम जमा करण्यास निष्फळ ठरली असेल तेव्हा अशा बाबतीत, ज्या अपराधाच्या बाबतीत प्रशमनाची नोटीस काढण्यात आली होती, अशा अपराधासाठी अशा व्यक्तीविरुद्ध सक्षम न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.
(५) जेव्हा खटला दाखल केल्यानंतर, पोट-नियम (२) अन्वये अपराधाचे प्रशमन करण्यात आलेले असेल तेव्हा, अधिकारी, त्याने दिलेल्या अशा आदेशाची प्रत, कलम ५६ च्या पोट-कलम (६) अन्वये करण्याची गरज असलेल्या कारवाईसाठी कलम ५३ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याच्या माहितीसाठी पाठवील.

प्रकरण- सात
संकीर्ण

४३. वेतन प्रदान.- जेव्हा कर्मचारी, एखाद्या आस्थापनेमध्ये कंत्राटदारामार्फत काम करीत असतील तेव्हा, कंपनी किंवा भागीदारी संस्था किंवा संघ अथवा जी आस्थापनेचा मालक आहे अशी अन्य कोणतीही व्यक्ती, संहितेच्या तरतुदींनुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या बाबतीत, त्याने किंवा तिने प्रदेय असलेल्या वेतनाची रक्कम, कंत्राटदारास प्रदान करील.

